# प्रकरण १
# महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती

**महाराष्ट्राचे प्राचीनत्व**

सांप्रत आपण ज्या प्रदेशाला महाराष्ट्र म्हणतो त्याची प्राचीन नावे दण्डकारण्य व दक्षिणापथ अशी आहेत. श्रीरामचंद्र वनवासात असता दण्डकारण्यात आला, तो महाराष्ट्राचा अतिप्राचीन वसाहतकाल. हिंदूतील दशावतारांच्या समजुतीप्रमाणे रामावतार आधीचा व कृष्णावतार नंतरचा. कृष्णावतारीच प्रसिद्ध भारतीय युद्ध झाले. त्याचा काळ ३३०० वर्षापूर्वीचा धरला जातो (डॉ. आळतेकर, अध्यक्ष, आरकाईल अँड कल्चरल् हिस्टरी विभाग, हिस्टरी काँग्रेस, कलकत्ता, सन १९३९). त्यापूर्वी राम एक सहस्त्र वर्षे होऊन गेला असे मानल्यास, रामावतार सुमारे ४३०० वर्षाइतका जुना समजावा लागतो. त्याकाळी राम दण्डकारण्यात गोदावरीच्या काठी पंचवटीत आगस्त्यऋषीच्या आश्रमापासून दोन योजने अंतरावर राहात होता. वायु, मत्स्य व मार्कंडेय या पुराणात पुढील माहीती आढळते- 'सह्याद्रीच्या उत्तर भागात जेथे गोदावरी आहे व गोवर्धननामक नगर आहे, तेथे सर्व पृथ्वीतलावर अत्यंत सुंदर उद्यान राम व सीता यांजकरिता भारद्वाजऋषीने निर्माण केले. ह्यावरून सध्याच्या नाशिकाच्या आसपास राम राहात होता हे स्पष्ट आहे. महाराष्ट्रातील ब्राह्मणलोक रोजच्या संकल्पात 'दण्डकारण्ये देशे' असा उच्चार करतात, तोही लक्षात घेता आर्यलोक महाराष्ट्रात वसाहतीस आले तेव्हा तेथे दण्डकारण्य असल्याचे सिद्ध होते. त्यावेळी ऋषींची वस्ती तुरळक व तुटक निरनिराळ्या नद्यांच्या आश्रयाने झाली असावी.

राम ज्या दण्डकारण्यात आला, त्याचा विस्तार व क्षेत्रफळ काय होते असा प्रश्न येथे उद्‌भवतो. कै. चिं. वि. वैद्य यांच्या मते चित्रकूट पर्वतापासून, म्हणजे हल्लीच्या रेवा संस्थानापासून, मलयाचलापर्यंत अर्थात म्हैसुरापर्यंत दण्डकारण्य लागून राहिले होते. महाभारतातील वर्णनाप्रमाणे मध्यहिंदुस्थान आणि तापी व पयोष्णी या नद्या, इतका प्रदेश दण्डकारण्यात मोडत होता. पण या वर्णनात वैगुण्य असे की, त्यात खानदेशापासून पश्चिम व दक्षिण या दिशाकडील प्रदेश येत नाही. यादवांचा मंत्री हेमाद्री याने व्रतखंडाच्या प्रारंभी 'देवगिरी सेऊण देशांत आहे व सेऊण देश दण्डकारण्याच्या सीमेवर आहे' असे म्हटले आहे. ही सीमा बहुधा दक्षिणेकडील असावी. प्रसिद्ध इतिहासकार पार्जिटर म्हणतो त्यावरून बुंदेलखंडापासून कृष्णानदी पर्वतचा प्रदेश दण्डकारण्यात धरावा लागतो. रा. वैद्य व पार्जिटर यांची मते बहुतांशी परस्परांशी जुळती आहेत. रामायणाच्या उत्तरकांडात दण्डकारण्य हे मूळचे विस्तृत राष्ट्र असून पुढे त्यांचे अरण्य बनले अशी कथा आहे. जगातील वारंवार होणारी स्थित्यंतरे लक्षात घेता जे रामावतारी दण्डकारीण्य होते ते त्यापूर्वी मनुष्यवस्तीने गजबजलेले राष्ट्रही असेल. दण्डकारण्याशिवाय महाराष्ट्राचे दुसरे नाव दक्षिणापथ. याचा उल्लेख बौद्धायन स्मृतीत, कौटिलीय अर्थशास्त्रात, महाभारतात, रामायणात, पतञ्जलीच्या महाभाष्यांत, समुद्रगुप्ताच्या अलाहाबादेतील स्तंभावर, नाणेघाटातील शिलालेखात व शत्रप रुद्रदामन याच्या गिरिनारावरील शिलालेखात आढळतो. महाभारत व रामायण या दोन ग्रंथांत जरी दक्षिणापथ व दण्डकारण्य हे दोन्ही शब्द आले असले, तरी त्यावरून भारतीययुद्धकाळी व रामावतारी दण्डकारण्याच्या बरोबरीने दक्षिणापथ हा शब्द वापरीत असतीलच असे निश्चयपूर्वक म्हणवत नाही. ज्याअर्थी शातवाहनांच्या काळापर्यंत दक्षिणापथ हे नाव वापरण्यात येत होते त्याअर्थी सदर नाव दण्डकारण्याहून अर्वाचीन असावे असे वाटते.

दक्षिणापथाची उत्तरेकडील मर्यादा सामान्यतः विंद्यपर्वत समजण्यात येते. पण बौद्ध लेखकांनी अवंतीच्या, म्हणजे उज्जयिनीच्या, भोवताचा प्रदेश याचीही गणना दक्षिणापथातच केली आहे. जातकांतहीहि अवन्ती हा दक्षिणापथाचा भाग सांगितला आहे. म्हणजे, बौद्ध लेखकांच्या मते दक्षिणापथाची उत्तरेकडील मर्यादा विंध्यपर्वतापलिकडे जाते. दहाव्या शतकांतील लेखक अभिनवगुप्त हा विंध्या व दक्षिणसमुद्र यांजमधील प्रदेशाला दाक्षिणात्य देश म्हणतो. याचा अर्थ विन्ध्याद्रीपासून रामेश्वरापर्यंतचे जे दक्षिण-हिंदुस्थान तोच दक्षिणापथ, पण कित्येक ब्राह्मण लेखकांनी दक्षिणापथाची उत्तर मर्यादा विन्ध्यपर्वत ही न धरता नर्मदा नदी ही धरली आहे. त्याचप्रमाणे, दहाव्या शतकातील प्रसिद्ध लेखक राजशेखर हा आर्यवर्त 'नर्मदायाः दक्षिणेन देशो दक्षिणापथः' असेच लिहितो. भरताने आपल्या नाट्यशास्त्र या ग्रंथात दक्षिणापथाच्या सीमा पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

महेन्द्रो मलयः सह्यो मेकलः पलपिंजरः ।
एतेषु या श्रिता देशाः स ज्ञेयो दक्षिणपथः ।।

असे दक्षिणापथाचे त्याने वर्णन केले आहे. सारांश, स्थूलमानाने विन्ध्यपर्वतापासून, किंवा त्यात उगम पावलेल्या नर्मदेपासून, तो थेट कन्याकुमारीपर्यंत जो उत्तर-दक्षिण व पूर्व-पश्चिम अफाट प्रदेश पसरला आहे तो दक्षिणापथ, असे समजण्यास हरकत नाही. यावरून दण्डकारण्य व दक्षिणापथ यांची एकमेकांत सरमिसळ झाली असली तरी त्यांच्या मर्यादा समान नाहीत हे स्पष्ट दिसते.

दण्डकारण्य व दक्षिणापथ या नावांनी संबोधल्या जाणाऱ्या अफाट मुलुखाचा महाराष्ट्र हा एक लहानसा भाग होय. भरताचे नाट्यशास्त्र हा ग्रंथ महामहोपाध्याय हरप्रसादशास्त्री यांच्या मते खि. पू. दुसऱ्या शतकात झाला. पण कीथ, जाकोबी व विंटरनीझ यांच्या मताप्रमाणे तो ग्रंथ इ.स. च्या तिसऱ्या शतकातील आहे. महाराष्ट्रीय लोकांचे, नाव घेतले आहे. रामायण व महाभारत यांना महाराष्ट्र माहीत नाही. पण वायु, ब्रह्म व मार्कण्डेय या पुराणात महाराष्ट्राचा निर्देश अमीर, शबर व कलिंग यांजबरोबर केलेला आहे. वात्स्यायन आपल्या कामसूत्रात (इ.स. ४०० चा सुमार) 'नर्मदा कर्णाटविषयोर्मध्ये महाराष्ट्रविषयः' अशी महाराष्ट्राची उल्लेखपूर्वक मर्यादा आखतो. तसेच तो कर्णायविषयाद्दक्षिणेन द्रविडविषयः । कोकणविषयात्पूर्वेण वानवासविषयः ।। असेही म्हणतो.

महावंश हा बौद्धसांप्रदायिक ग्रंथ इ.स. ४५९ ते ४७४ च्या सुमारास लिहिण्यात आला. त्यात अशोकच्या राज्याच्या १७व्या वर्षी काश्मीर, वनवासी व महाराष्ट्र यात बौद्ध प्रचारक पाठविल्याचा वृत्तान्त आहे. वराहमिहिर हा शके ४२७ त (इ.स. ५०५) होता. त्याने बृहत्संहितेच्या १० व्या अध्यायात 'भाग्ये रसविक्रयिणः पण्यस्त्रीकन्यका महाराष्ट्रः' असे म्हटले आहे. त्यावरून वराहमिहिरास महाराष्ट्र माहीत असल्याचे स्पष्ट होते. प्रसिद्ध संस्कृत ग्रंथकार दण्डी हा सहाव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. त्याने महाराष्ट्रातील प्राकृतत भाषेची स्तुती करून तीतील सेतुबंध काव्य प्रशंसिले आहे. ह्युएनत्संग हा चिनी प्रवासी इ.स. ६२९ ते ६४९ पर्यंत हिंदुस्थानात हिंडून गेला. त्याला महाराष्ट्र देश ज्ञात असून त्याचा विस्तार एक सहख मैल (सहा सहस्र ली) असलेला तो नमूद करतो. त्याने महाराष्ट्र शब्दाचा उच्चार मोहालशो (Mo-ha-la-cho) असा केला आहे. कुवलयकथा या ग्रंथाचा कर्ता इ.स. ७७७त होऊन गेला. तो महाराष्ट्रविषयी लिहितो, 'महाराष्ट्रीय लोक ठेंगणे, मजबूत, सहनशील व किंचित् काळे आहेत. ते गर्विष्ठ व भांडखोर असून मोठ्याने बोलतात. आठव्या शतकातील मुरारि याने आपल्या अनर्घराघव या ग्रंथांत महरष्ट्र देशाचे कुंडिननगर हे अद्वितीय भूषण म्हटले आहे. दहाव्या शतकातील नाटककार राजशेखर याने विदर्भ व महाराष्ट्र हे एक असल्याचे सांगून विदर्भ हे ज्ञानाचे माहेर आहे अशी त्याची वाखाणणी केली आहे.

आलबेरूणी हा अरब फिरस्ता हिंदुस्थानात इ.स. १००० त येऊन गेला. 'धारेकडून दक्षिणेकडे जात असता वाटेत मरहट्ट देश, कोकणप्रांत व त्याची राजधानी ठाणे लागते' असे त्याने लिहिले आहे. ही प्रमाणे इ.स. च्या तिसऱ्या शतकापासून अकराव्या शतकापर्यंत महाराष्ट्र किंवा मरहट्ट ही दोन नावे अवाधितपणे रूढ असलेली सिद्ध करण्यास पुरेशी आहेत. त्यावरून महराष्ट्र देश, महाराष्ट्राची भाषा व महाराष्ट्रीय लोक यांजसंबंधी तत्कालीन लेखकांचे मतही आपणास समजते. तसेच महाराष्ट्राचे कोकण, विशेषतः विदर्भ तथा वऱ्हाड हे पोटविभाग असल्याचेही दिसून येते. किंबहुना महाराष्ट्राचा प्रधान भूभाग विदर्भ हाच असून तो विद्येत विशेष भरभराटलेला होता. महाराष्ट्र या देशवाचक शब्दाविषयी पाहाता तो शब्द महाराष्ट्रास पाचव्या शतकापासून लावण्यात येत असल्याचे आतापर्यंतच्या विवेचनाने स्पष्ट झाले आहे.

बदामी येथील चालुक्यांच्या काळात ऐहोळी येथील जैन मंदिरांत एक शिलालेख जैन कवी रविकीर्ती याने शके ५५६ मध्ये लिहिला आहे. विविध वृत्तांत रचलेले ते एक लहानसे काव्यच आहे. सदर काव्यातील दोन श्लोक प्रकृतस्थळी लागू आहेत. वर्णन चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याच्या दिग्विजयाचे असून त्यात कोकणाचा उल्लेख येणेप्रमाणे आहे.

कोकणेषु यदादिष्टचंडदण्डांबुवीचिभीः । उदस्तास्तरसा मौर्यपल्वलांबुसमृद्धयः ।।

'कोकण प्रांतात, त्याच्या आदेशात वागणाऱ्या सैन्यरूपी पर्वतप्राय लाटांनी एखाद्या डबक्यातील तरंगाप्रमाणे हालणाऱ्या मौर्य सैन्याच्या समृद्धीला खाली बसविले.' यावेळी कोकणावर मौर्यांचा अंमल असून त्यांचा पुलकेशीने पराभव केला. आता दुसरा श्लोक -

विधिवदुपचितामिश्शक्तिमिश्शक्रकल्पः ।तिसृभिरपिगुणौधैःस्वैश्वमाहाकुलाद्यै : ।।

अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणाम्। नवनवतिसहस्रग्रामभाजा त्रयाणाम् ।।

'ज्याने तिन्ही शक्ती विधियुक्त रीतीने वाढविल्या आहेत, आणि त्यामुळे जो इंद्रतुल्य दिसत आहे. त्याच उच्च घराण्यांतील जन्मामुळे त्याने ९९ हजारो खेडी असलेल्या तिन्ही महाराष्ट्राचे आधिपत्य मिळविले.

यापासून दोन तत्त्वे समजली. एक, कवीने कोकणाचा उल्लेख स्वतंत्रपणे केला, व दुसरे, त्याने तीन महाराष्ट्रके' म्हटले. येथे महाराष्ट्र हा शब्द नसून 'महारष्ट्रक' असा शब्द आहे. ज्यात ९९ हजार गावे आहेत असा हा तीन महाराष्ट्रकांचा समुदाय आहे. रा. काणे यांनी तीन महाराष्ट्रक हे महाराष्ट्राचे तीन विभाग धरून विदर्भ, मुख्य महाराष्ट्र (खानदेश ते सातारा) व कुंतल, असे एकच भाषा बोलणारे तीन विभाग दर्शविले आहेत. परंतु पुलकेशी हा एकट्या मराठी भाषा (प्राकृत) बोलणारांचा अधिपती नसून त्याच्या ताब्यात मराठीप्रमाणे कानडी व आन्ध्र भाषा बोलणारे प्रदेशही होते हे लक्षात ठेवल्यास तीन महाराष्ट्रक म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक व आन्ध्र ही तीन महाराष्ट्र होत असे मानावे लागते. त्याशिवाय महाराष्ट्रक याचा आणखी एक अर्थ संभवतो. तो म्हणजे तीन महाराष्ट्रात राहणारे लोक. ते अर्थातच महाराष्ट्रीय, कन्नड व आन्ध्र लोक होते. अशा या तीन लोकांचे आधिपत्य पुलकेशीकडे होते. असे रविकीर्तेनि म्हणावे यात गैर काहीच नाही. या तीन महाराष्ट्रकांपैकी एक महाराष्ट्र म्हणजे सध्याचा महाराष्ट्र स्पष्टच आहे. उरले कर्नाटक व आन्ध्र; त्यास महाराष्ट्र हे नाव खास महाराष्ट्राच्या जोडीस बसविण्याकरिता रविकीर्तेनि गौरवार्थ लावावे यात नवल नाही.

महाराष्ट्र हे नाव आपल्या प्रांतास का पडले ह्याविषयी वेगवेगळे तर्क चालविण्यात येतात. शातवाहन कालांत महाराष्ट्रात ठिकठिकाणी रथी व महारथी हे मोठे अधिकारी किंवा संस्थनिक या नात्याने वावरत असल्यामुळे या प्रांतास महाराष्ट्र संज्ञा प्राप्त झाली, असे डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे मत आहे. नाणे-घाटातील पुतळ्याजवळच्या शिलालेखात 'महारठी गनकयिरो' म्हणजे 'महाराष्ट्री किंवा महारथी गणकवीरः' असे शब्द आहेत. त्याप्रमाणे कार्ले, कान्हेरी इत्यादी लेण्यांत महारथींचा उल्लेख आहे. त्यांचा आधार वरील मतास देण्यात आला आहे. परंतु रथी व महारथी हे केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर कर्नाटकांतही असल्याने प्रस्तुत मत सयुक्तिक ठरत नाही.

महाराष्ट्राविषयी आणखी एक अनुमान संभवते. महाराष्ट्र या नावावरून त्याच्या पोटात अनेक राष्ट्र, अर्थात लहान देश, समाविष्ट असल्याचा बोध होतो. हल्लीचा महाराष्ट्र गोव्यापासून सुरतेपर्यंत दक्षिणोत्तर, व सुरतेपासून नागपुरापर्यंत पश्चिमपूर्व, परसला आहे. इतक्या विस्तीर्ण भूभागास महाराष्ट्र म्हणतात, हे ज्ञान महाराष्ट्रातील सर्व अबालवृद्धांना आज आहे. याची कारणे सार्वत्रिक शिक्षणप्रसार व शीघ्रगामी प्रवाससाधने अशी सांगता येतील. महाराष्ट्र म्हटला की त्याच्या वर सांगितलेल्या मर्यादा नकाशाच्या साहाय्याने सर्वांच्या डोळ्यासमोर एकदम उभ्या राहतात. या ज्ञानात वर्तमानपत्रांनीही भर घातली आहे. ही साधने ज्या काळात उपलब्ध नव्हती त्या काळात इतक्या विस्तीर्ण भूभागाची एकजिनसी कल्पना सामान्य मनुष्यास शक्य नव्हती. त्या काळात महाराष्ट्र शब्द जर कोणाच्या ऐकण्यात व बोलण्यात प्रामुख्याने असेल तर तो फक्त विद्वानांच्याच इतरांना आपल्या सभोवारच्या पन्नास कोसांचीच फक्त माहिती असे. म्हणूनच जुन्या काळात इतक्या लहान विस्ताराची राष्ट्र किंवा देश बनत. या दृष्टीने महाराष्ट्रात विदर्भ, अश्मक, अपरान्त, मूलक, सेऊण, कुंतल इत्यादी लहान देश वा राष्ट्र निरनिराळ्या काळी निर्माण झाली असून त्या त्या राष्ट्रांतील लोक आपआपल्या टापूस त्या त्या नावाने ओळखत असत. त्या सर्वांचा समावेश करणारे महाराष्ट्र त्यांच्या डोळ्यापुढे नसे.

समान भाषा, समान आचारविचार व समान धर्म या त्रिविध साधनांनी राष्ट्राला मूर्तस्वरूप येत असले, तरी हिंदुस्थानासारख्या समान धर्माच्या विस्तीर्ण देशात राष्ट्र बनण्यास भाषा हेच प्रभावी कारण झालेले आढळते. मराठी ही एक भाषा असताही तिच्यातही प्रातंपरत्वे सूक्ष्म भेद आहेतच. ते भेद विसरून व स्थूल साम्यावर नजर देऊनच मराठीची व्याप्ती ठरविण्यात आली आहे. गोमांतकी, कोकणी खानदेशी, वऱ्हाडी या भिन्न बोलींना मराठी भाषा असे याच कारणाने

म्हणतात. मराठीचा जन्म महाराष्ट्री या प्राकृत भाषेपासून झाला आहे. महाराष्ट्री ही शातवाहन कालापासून किंवा त्यापूर्वीपासून महाराष्ट्रात रूढ आहे. ती बोलणारी अनेक राष्ट्र महाराष्ट्रात असल्याने त्या सर्व राष्ट्रांना समावेशक असे महाराष्ट्र हे नाव देण्यात आले. आता, महाराष्ट्रीवरून महाराष्ट्र हे नाव उद्‌भवले की महाराष्ट्रावरून महाराष्ट्री हे नाव भाषेला मिळाले, असा बिकट प्रश्न उत्पन्न होतो. त्याकडे तारतम्याने पाहिल्यास महाराष्ट्री या भाषावाचक नावावरून महाराष्ट्र हे देशवाचक नाव निर्माण झाले असावे, असे मानणेच सयुक्तिक दिसते. म्हणजे, महाराष्ट्री आधीची व महाराष्ट्र नंतरचे. नाणेघाटातील पुतळ्याजवळच्या शीलालेखात 'महारठी गनकयिरो' म्हणजे 'महाराष्टी गणकवीर' असे शब्द आहेत.

**महाराष्ट्र: प्रदेशनाम**

महाराष्ट्र हे भारतीय संघराज्यातील एक प्रमुख राज्य आहे. आजच्या महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. 'महाराष्ट्र' हे देशनाम इ.स.च्या चवथ्या शतकापासून आढळते. मध्य प्रदेशातील सागर जिल्ह्यातील पुरण या गावी सापडलेल्या स्तंभलेखात शकवंशी महाक्षत्रप राजन् श्रीधरवर्मा याचा आरक्षिक (रक्षक- प्रमुख) सत्यनाग याने एरण येथे झालेल्या घोर युद्धात पडलेल्या नाग सैनिकांच्या स्मृत्यर्थं एक यष्टी उभारल्याचा उल्लेख आहे. त्या लेखात सत्यनागाला 'माहाराष्ट्र' असे म्हटले आहे'. वराहमिहिराच्या (इ.स. ५०५) 'बृहत्संहिते'च्या दहाव्या अध्यायात 'महाराष्ट्रीय' या अर्थान 'महाराष्ट्राः' हा शब्द आलेला आहे. दण्डीने (सहावे शतक) 'काव्यादर्शा'त 'महाराष्ट्रातील भाषा ही मुख्यतः प्राकृत आहे' असे म्हटलेले आहे. येथे दण्डीला प्राकृत म्हणजे महाराष्ट्री प्राकृत अभिप्रेत होती. चालुक्यवंशीय दुसरा पुलकेशी हा तीन महाराष्ट्रकांचा स्वामी असल्याचा उल्लेख ऐहोळे शिलालेखात (इ.स. ६३४) आढळतो. युआन च्वांग हा चिनी यात्रेकरू इ.स. ६४१ मध्ये महाराष्ट्रात आला होता. त्याने 'मो-हा-ला-चा' असा महाराष्ट्राचा उल्लेख केलेला आहे.

आज आपण ज्या भूप्रदेशाला महाराष्ट्र हे नाव दिलेले आहे, त्यात कोकण, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, दक्षिण महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्र यांचा समावेश झालेला आहे. 'महाराष्ट्र' या नावाचा महाराष्ट्र है देशवाचक नाव पुराणादी प्राचीन ग्रंथांत येते. पण या संथांचे काळ अनिश्चित आहेत. सिद्दलद्वीपाच्या 'दीपवंश' व 'महावंश' संघांतही अशोकाने महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार करण्याकरिता भिक्षु पाठविले होते, असा निर्देश आहे. पण है संच पाचव्या सहाव्या शतकातील आहेत. संस्कृत वाङ्मयातील 'बृहत्संहिता', 'काव्यादर्शा दी ग्रंथांत महाराष्ट्राचा निर्देश आहे, पण हे ग्रंथ इ.स. च्या सहाव्या शतकातील किंवा नंतरचे आहेत. तेव्हा श्रीधरवर्त्यांच्या काळच्या म्हणजे इ.स. चौथ्या शतकातील या लेखात महाराष्ट्राचा निर्देश आहे तो कालक्रमाने पहिला उरतो यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे: ही तीन महाराष्ट्रके कोणती? इतिहासाचार्य राजवाडे 'हो तीन महाराष्ट्र येणेप्रमाणे असावी सध्या ज्याला वन्हाड म्हणतात ते बहरष्ट्ः वा बहरह देश उत्तरेस होता. सध्या ज्याला कऱ्हाड म्हणतात ते कहरह. हा कहरट्ट देश दक्षिणेस होता. आणि ह्या उत्तरदक्षिण देशांच्या मधला जी रहांचा मध्य देश तो महरट्ट. नाशकापासून वाईपर्यंतचा जो देश तो महरह, खानदेशापासून (कन्हदेशापासून) उमरावतीपर्यंतचा जो देश तो बहरह, आणि बाईपासून कोल्यापुरापर्यंतचा जो देश तो कहरट्ट, बहरत देश म्हणजे उत्तरेकडील रङ्गांचा देश, कहरद्ध देश माणजे दक्षिणेकडील रहांचा देश, आणि महरट्ट देश म्हणजे या दोन्हींच्या मधील रहांचा देश. ह्या तिन्ही भागांत रह लोक राहत.उल्लेख होण्यापूर्वी विदर्भ, मूलक, अश्मक, ऋषिक, अपरान्त, कुंतल ही वेगवेगळी जनपदे या भूभागावर होती.

नर्मदा नदीच्या दक्षिण तीरापासून कन्याकुमारीपर्यंतच्या विशाल प्रदेशाला 'दक्षिणापथ' हे नाव होते. मार्कण्डेय, वायू आणि मत्स्य पुराणांत दक्षिणापथाचा उल्लेख आढळतो. महाभारतातही असा उल्लेख आहे. वायुपुराणात गोदावरी इत्यादी सह्याद्रीतून उगम पावलेल्या नद्यांचा उल्लेख करताना दक्षिणापथाचा निर्देश केलेला आहे. आजचा महाराष्ट्र हा त्या प्राचीन दक्षिणापथाचा एक भाग आहे. दक्षिणापथाच्या निर्देशाबरोबरच 'दंडकारण्य देश' अशी जी शब्दसंहती वापरली जाते ती दंडकारण्य व महाराष्ट्र यांच्या एकरूपतेची सूचक आहे. दक्षिणापथ, दंडकारण्य आणि महाराष्ट्र या तिन्ही संज्ञा एकाच प्रदेशाचा निर्देश करीत असल्या तरी महाराष्ट्र हे प्रदेशवाचक नाव इ.स.च्या चवथ्या शतकापासून आढळते, हे वर म्हटलेलेच आहे. इ.स. १६६६ मध्ये लिहिल्या गेलेल्या डिंभ कृष्णमुनी या महानुभावीय कवीच्या 'ऋद्धपुरमाहात्म्य' या ग्रंथात महाराष्ट्रदेशाच्या सीमा पुढीलप्रमाणे सांगितलेल्या आहेत: विध्याद्विपासौनी दक्षणदिशेसी । कृष्णानदीपासौनी

उत्तरेसी। झाडीमंडळापासौनी पश्चमेसी। कुंकणपर्यंत महाराष्ट्र बोलिजे यातें. महाराष्ट्राची प्राकृतिक रचना भारताच्या भौगोलिक नकाशात महाराष्ट्राचे स्थान उत्तर आणि दक्षिण भारत यांच्या मध्यभागी आहे. पश्चिमेला अरबी समुद्र, पूर्वेला मध्यप्रदेश, दक्षिणेला आंध्र आणि कर्नाटक व उत्तरेला गुजराथ आणि मध्यप्रदेश यांनी महाराष्ट्राच्या सीमा निर्धारित केलेल्या आहेत. लाव्हा रसाच्या स्तरांनी महाराष्ट्राचा भूभाग तयार झालेला आहे. लाव्हा रसाचे स्तरांवर स्तर चढल्याने येथे पर्वताच्या रांगा तयार झाल्या. त्या रांगांना छेदून जाणाऱ्या अनेक नद्या महाराष्ट्रातून वाहू लागल्या. समुद्र, पर्वत आणि नद्यांमुळे महाराष्ट्राला स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व प्राप्त झालेले आहे. लाव्हा रसातून तयार झालेला कृष्णप्रस्तर प्रदेश हे महाराष्ट्राचे खास भूवैज्ञानिक असे वैशिष्ट्य आहे.

दक्षिणोत्तर पसरलेल्या सह्याद्री पर्वतामुळे महाराष्ट्राचे कोकण आणि देश असे नैसर्गिक विभाग तयार झालेले आहेत. अरबी समुद्र आणि सह्याद्री पर्वत यांच्या मधल्या प्रदेशाला कोकण म्हणतात. 'देशा'चे स्थूल मानाने चार उपविभाग केले जातात. ते असे तापी आणि पूर्णा खोरे, वर्धा आणि वैनगंगा खोरे, गोदावरी खोरे आणि कृष्णा खोरे, उत्तरेस दमणगंगा नदीपासून दक्षिणेस तेरेखोल खाडीपर्यंतच्या भूप्रदेशाला कोकण असे म्हणतात. सह्याद्रीच्या पूर्वेस विस्तृत पठारी प्रदेश आहे. त्यालाच 'देश' असेही नाव आहे. पूर्वेस भामरागड व चिरोली टेकड्यांपर्यंत, उत्तरेकडील सातपुडा पर्वतापासून दक्षिणेस कोल्हापूरपर्यंत पठारी प्रदेश पसरलेला आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे जाताना सातपुडा पर्वत, तापी-पूर्णेचे खोरे, सातमाळा-अजिंठा डोंगररांगा, भीमा खोरे, महादेवाचे डोंगर, कृष्णा नदीचे खोरे अशी या पठारी प्रदेशाची रचना आहे.

प्राकृतिक रचनेमुळे महाराष्ट्रातील नद्या पूर्ववाहिनी आणि पश्चिमवाहिनी आहेत. तापी ही पश्चिम वाहिनीतील सर्वात लांब व प्रमुख नदी असून पूर्णा ही तिची उपनदी होय. पूर्ववाहिनींमध्ये गोदावरी, भीमा, कृष्णा या प्रमुख नद्या आहेत. विदर्भातील वर्धा, वैनगंगा या दक्षिणवाहिनी नद्या आहेत.

महाराष्ट्राचा वसाहत काल

सुमारे दोन ते तीन लाख वर्षापूर्वी आद्य पुराश्मयुगात आजच्या महाराष्ट्रातील घोड, भीमा, प्रवरा, गोदावरी आणि वैनगंगा या नद्यांच्या खोऱ्यांमधून प्राचीन मानव भटक्या अवस्थेत जीवन जगत होता. गोदावरी, प्रबरा, मुळा-मुठा, कृष्णा, भीमा, तापी, मांजरा, घोड, कुकडी, वैनगंगा, पैनगंगा, पूर्णा, वर्धा या नद्यांच्या खोऱ्यांत केलेल्या सर्वेक्षणांतून तसेच गोदावरीच्या काठचे नांदूर-मधमेश्वर, पैठणजवळचे मुंगी, नाशिकजवळचे गंगापूर, नगरजवळचे नेवासे, जळगावजवळचे पाटणे, रायगडजवळचे घारापुरी व पाचाड, रत्नागिरीजवळचे हातखंबा आणि चंद्रपूरजवळचे पापामिया येथील उत्खननांतून सापडलेली हत्यारे, प्राण्यांचे सांगाडे इत्यादींवरून प्राचीन मानवाची स्थिति-गती समजणे शक्य झालेले आहे.

महाराष्ट्रातील अतिप्राचीन मानवी वसाहतीचे अश्मयुग, ताम्रपाषाणयुग आणि लोहयुग असे तीन कालखंड पडतात. अश्मयुगाचे आद्य पुराश्मयुग, मध्य पुराश्मयुग, उत्तर पुराश्मयुग आणि मध्याश्मयुग असे चार विभाग केले जातात. आद्य पुराश्मयुगात महाराष्ट्रातील मानव प्रामुख्याने शिकारीवर जगत होता. फळे आणि कंदमुळे हीदेखील त्याच्या आहाराची सामग्री होती. या काळातील मानवाने दगडी हत्यारे, हातकुऱ्हाडी, तासून टोकदार केलेल्या लाकडी काठ्या यांच्या साहाय्याने उपजीविकेसाठी आवश्यक त्या गोष्टी मिळविल्या असाव्यात. तो जंगली हत्ती, जंगली बैल यांची शिकार करीत असावा. नेवासे (जि. अहमदनगर) आणि गोदावरीची उपनदी मांजरा हिच्या काठावर वसलेल्या धनेगाव (जि. उस्मानाबाद) येथे या प्राण्यांच्या अश्मास्थी सापडलेल्या आहेत. मध्य पुराश्मयुगात म्हणजे इसबी सनापूर्वी एक लाख वर्षांपूर्वी तासणी आणि अणी यांसारखी छोटी हत्यारे मानवाने तयार केली असावीत. अंदाजे पंचवीस हजार वर्षापूर्वी तो गारेची हत्यारे बनवू लागला, पुरातत्त्ववेत्त्यांनी घेतलेल्या शोधात मुळा, प्रवरा, गोदावरी, तापी, गिरणा, मुळा-मुठा, पूर्णा, वर्धा, वैनगंगा, कृष्णा, घोड इत्यादी अनेक नद्यांच्या काठी प्राचीन अश्मयुगीन मानवाची हत्यारे मिळालेली आहेत. ही हत्यारे मुख्यतः दोन प्रकारची आहेत: १. गोट्यापासून केलेली हत्यारे आणि २. मोठ्या छिलक्यांपासून केलेली हत्यारे, या दोन्ही वर्गांत मिळून हातकुऱ्हाडी, फरश्या, तासण्या आणि तोडहत्यारे आढळून येतात.

मध्याश्म युगात गारांची पात्यांवर बनवलेली हत्यारे महाराष्ट्रात सापडतात. या काळात हवामानात बदल घडून आला. मध्याश्म युगानंतर येथे ताम्रपाषाण युग सुरू झाले. शेतीचे ज्ञान असलेल्या आणि तांब्याची व दगडी हत्यारे वापरणाऱ्या टोळ्या येथे स्थायिक झाल्या.

इ.स. पूर्व १६०० च्या सुमारास माळव्यातील आद्य शेतकरी खानदेशात आले. ते गोदावरी आणि भीमेच्या खोऱ्यात पोचले. त्यांनी तेथे बसाहती केल्या. बहुसंख्य वसाहती १००-२०० च्या आसपास लोकसंख्या असलेल्या छोट्या खेड्यांच्या होत्या. त्या खेड्यांना जोडणारी प्रादेशिक केंद्रे असत, तापीच्या खोऱ्यातील प्रकाशे (जि. धुळे), गोदावरीच्या खोऱ्यातील दायमाबाद (जि. अहमदनगर), भीमेच्या खोऱ्यातील इनामगाव (जि. पुणे) ही अशी केंद्रे होती.

जोर्वे-नेवासे संस्कृती म्हणून ओळखली जाणारी महाराष्ट्रातील मानवाची संस्कृती इ.स. पूर्व बाराशे ते पंधराशे या काळात उदयास आली असावी. जोर्वे आणि नेवासे या गाबांजवळ केलेल्या उत्खननातून ही संस्कृती प्रथम उजेडात आली त्यामुळे पुरातत्त्ववेत्ते 'जोर्वे-नेवासे' हा शब्दप्रयोग करतात. प्रकाशे (जि. धुळे), बहाळ आणि टेकेवाडा (जि. जळगाव), नाशिक, नेवासे आणि दायमाबाद (जि. अहमदनगर), चांदोरी, सोनगाव आणि इनामगाव (जि. पुणे) इत्यादी ठिकाणी उत्खनन झाले आहे. कुडाच्या भिंती आणि गवताने शाकारलेली छपरे असलेली घरे, रंगीत भांडी, गारांची आणि तांब्याची हत्यारे, दागिने, कणग्या आणि बळवे इत्यादी गोष्टी उत्खननातून उजेडात आल्या. जोर्वे-नेवासे संस्कृतीचे लोक शेती, पशुपालन, शिकार आणि मासेमारीवर उदरनिर्वाह करीत. जोर्वे-नेवासे संस्कृतीमधील भांडी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ही भांडी पातळ असून चाकावर बनवलेली आहेत, विटकरी, तांबूस अशा रंगाची ती असून काळ्या रंगाच्या रेषांनी त्यांवर नक्षीकाम केलेले दिसते. या भांड्यांची भाजणी उत्तम झालेली असल्यामुळे धातूच्या भांड्याप्रमाणे त्यांचा खणखणीत आवाज येतो. या काळातील मानव शाकाहार आणि मांसाहार असा मिश्र आहार घेत असावा, अंगणात खड्डा करून तो जनावराचे मांस भाजत असे. अन्नधान्याचे पीठ करण्यासाठी तो खल आणि वरवंटा वापरीत असे.

मृतांना राहत्या घरातच पुरण्याची पद्धती या कालखंडात आढळते. लहान मुलांना कुंभात पुरत असत. आद्य शेतकऱ्यांच्या वसाहती जवळजवळ एक हजार वर्षपर्यंत भरभराटीला आलेल्या होत्या. इ.स. पूर्व ५०० च्या आसपास हवामानात बदल झाला, पावसाचे प्रमाण कमी झाले. तापी, प्रवरा, गोदावरी या नद्यांच्या खोऱ्यातील ताम्रपाषाणयुगीन वसाहती उजाड झाल्या. लोह मौर्ययुगादी वसाहतींचा शेवट झाला. नेवाशाला याबाबतीत महत्त्वाचा पुरावा मिळालेला आहे. इ.स. पूर्व दुसऱ्या तिसऱ्या शतकातील सातवाहनकालीन घरांखाली नेवाशाचे ताम्रपाषाणयुगीन वस्तीचे स्थळ आहे. नेवाशाच्या ताम्रपाषाणयुगीन वस्तीनंतर बराच काळपर्यंत तेथे वस्ती झाली नाही

इ.स. पूर्व ५०० च्या सुमारास लोहयुगीन संस्कृती परिपक्व झालेली दिसून येते. मानवी संस्कृतीतील लोहाचे आगमन हा एक क्रांतिकारक टप्पा ठरला. लोहाचे आगमन नेमके कुठून झाले हे सांगता येत नसले तरी इ.स. पूर्व ८०० च्या दरम्यान भारताच्या इतर भागांप्रमाणे महाराष्ट्रातही त्याचे आगमन झाले असावे. लोखंडाचे ज्ञान झाल्यामुळे मनुष्य लोखंडी नांगर वापरून काळ्या जमिनीत लागवड करू लागला. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले, भाजलेल्या विटांची घरे आणि तटबंदीची शहरे निर्माण झाली. दळणवळण वाढले. व्यापार वाढला. मानवी जीवनात लोहाचे आगमन व ओळख होताच आणि व्यवहारात त्याचे महत्त्व समजून येताच अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडून आल्या. मोठमोठ्या शहरांची झपाट्याने बाढ होत गेली. ती होण्यासाठी मोठ्या आकारातील भाजलेल्या विटांच्या भव्य वास्तू उभारल्या गेल्या. त्यांवर कौलारू छपरे आली. अशा प्रकारे निर्माण झालेल्या ह्या शहरांच्या सुव्यवस्थेसाठी नगरपालिका अस्तित्वात आल्या. व्यापारी देवाणघेवाण करण्यासाठी पेढ्या निर्माण झाल्या. व्यापारी व कामगार लोकांचे संघ निर्माण झाले. पाश्चात्य देशांशी दर्यावर्दी व्यापाराची भरभराट सुरू झाल्याने कल्याण, चौल, सोपारा, भडोच इत्यादींसारखी बंदरे विकास पावून त्यांची वाढ झाली. नाण्याचा व्यवहार पैशाच्या स्वरूपात होऊन तो प्रचारात आला.

महाराष्ट्रात इ.स. पूर्व २०० च्या आसपास किंवा काही काळ आधी नगर संस्कृतीचा प्रारंभ झालेला होता. सातवाहन काळात महाराष्ट्रात बरीच शहरे होती. कल्याण, चौल (चेऊल), सोपारा (शूर्पारक) ही बंदरे होती आणि जुन्नर, नाशिक, पैठण, तेर, भोकरधन आणि कोल्हापूर (ब्रह्मपुरी) ही महत्त्वाची व्यापारी आणि राजकीय केंद्रे होती. त्यापूर्वी महाराष्ट्रात विविध ठिकाणी नगर संस्कृतीचा उदय झालेला होता. यवतमाळ जिल्ह्यातील अरुणावती नदीच्या काठी

असलेल्या आर्णी या गावी महापाषाणीय काळापासून लोकवस्ती होती. ती मौर्यकाळापासून मौर्योत्तर सातवाहन काळापर्यंत होती. सातवाहनकाळाच्या आसपास तेथे पक्क्या विटांच्या इमारती होत्या. काळी झिलई असलेली भांडी इथे मिळाली. रत्न, मोती आणि सोन्याच्या अलंकारांबरोबरच काचेच्या बांगड्यादेखील सापडल्या. लोखंडाच्या वस्तूंशिवाय तांब्याची आणि शिशाची नाणीही सापडली. अमरावती जिल्ह्यातील कॉडिण्यपूर ही विदर्भाची प्राचीन राजधानी कुंडिनपूर या नावाने ओळखली जात होती. इ.स. पूर्व ३०० पासून ही वस्ती असावी. इ.स.च्या २०० वर्षानंतर या नगराची अवनती झाली. भंडारा जिल्ह्यातील पवनी हे नगर इ.स. पूर्व चवथ्या शतकात अस्तित्वात आले. औरंगाबाद जिल्ह्यातील भोकरधन अथवा प्राचीन भोगवर्धन येथे इ.स. पूर्व चवथ्या शतकापासून लोकवस्ती होती. तेर व भोकरधन येथे सापडलेल्या हस्तिदंती स्लीमूर्ती, रोमन नाणी, रोमन दिवे, मद्यकुंभ इत्यादींवरून या नगरांचा रोमशी व्यापारी संबंध होता, हे स्पष्ट होते. सातवाहन काळात हे शहर व्यापाराचे एक मोठे केंद्र होते. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर (प्राचीन तगर) हे दक्षिण भारतातील सर्वांत मोठे वाणिज्य-केंद्र होते

**आर्य आणि आर्येतर लोक**

महाराष्ट्रात बसती करणारे लोक मूळचे कुठले होते आणि कोण होते, वेगवेगळ्या कालखंडांत कोण लोक आले याविषयी संशोधकांत मतभेद आहेत. त्यांतून आर्य आणि आर्येतर यांच्यातील संघर्ष आणि समन्वयाच्या कल्पनांचा विस्तार झालेला दिसतो.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते इसवी सनाच्या पूर्वी सोळाव्या शतकापर्यंत महाराष्ट्र देश नव्हता. पाणिनीने शाल्व, पांचाल, कंबोज, पांडव, चोल इत्यादी देशाची नावे दिलेली आहेत. विंध्य पर्वताच्या दक्षिणेस घोर अरण्य आहे हे त्याला ठाऊक होते, परंतु तेथे लोकवस्ती आहे हे त्याला ठाऊक नव्हते, (पाणिनी हा इ.स. पूर्व १२०० ते ९०० या काळात केव्हातरी झाला, असे राजवाडे यांचे मत आहे. डॉ. रा. गो. भांडारकरांच्या मते तो इ.स. पूर्व सातव्या शतकाच्या आरंभकाळात होता. सरोजा भाटे, रा. पां. गोस्वामी यांच्या मते पाणिनीचा काळ इ.स. पूर्व ४ थे किंवा ५ वे शतक आहे.) इ.स. पूर्व सोळाव्या शतकात दंडकारण्यात आर्याची वस्ती झाली नव्हती. इ.स. पूर्व १६०० ते ११०० या काळात आर्य दंडकारण्यात शिरले असावेत, असे राजवाडे यांचे मत आहे. आर्य पश्चिमेकडून कोकणात उतरले आणि तेथून घाटांनी दंडकारण्यात शिरले. कन्हाडातून कृष्णेच्या खोच्यातून, नाशकाकडून गोदावरीच्या खोऱ्यातून आणि विदर्भाकडून पाईनगंगेच्या खोऱ्यातून आर्यांच्या दंडकारण्यात कायमच्या व भरभराटीच्या वसाहती झाल्या आणि शकपूर्व १०० च्या सुमारास दंडकारण्याचे दंडकारण्यत्व स्नानमंत्रविधीत तेवढे राहिले (तुळपुळे, शं. गो., १९७९ ७२). डॉ. श्री. व्यं, केतकर यांना राजवाडे यांचे विवेचन मान्य नाही. अगदी उजाड प्रदेश आर्य लोकांनी व्यापिला असे नाही, मूळचे लोक तेथे होतेच. त्यांच्या मते, अत्यंत प्राचीन काळी कोळी, भोई, महार आणि रङ यांची वस्ती महाराष्ट्रात होती (केतकर, १९३५), 'दंडकारण्यात आधी आर्यानी बसती केली आणि नंतर अनार्याची तेथे वसती झाली' हे राजबाडे यांचे मत य. रा. वाते, अ. ना. देशपांडे यांनीही अमान्य केले आहे. विदर्भ ही आर्यांची पहिली वसाहत असावी, गोदावरीच्या आसपासच्या प्रदेशात अरण्य असावे असे दाते यांचे मत आहे. केतकरांच्या मते, कुंतल, अपरान्त, विदर्भ, प्रतिष्ठानक इत्यादी देश बरेच जुने आहेत. महाराष्ट्रात आर्याची वसती होण्यापूर्वी उत्तरेकडून नाग लोक आले असावेत असे मत राजवाडे, वि. ल. भावे, तुळपुळे आदींनी मांडलेले आहे. इरावती कर्वे यांनीही नाग लोकांचे महाराष्ट्रातले अस्तित्व स्वीकारलेले आहे. इंद्रप्रस्थापासून कलिंगाच्या हद्दीपर्यंत नाग लोक पसरलेले होते, आर्यांनी त्यांना दक्षिणेकडे, पूर्वेकडे रेटले. भिल्ल, गोंड, बैगा, कोळी वगैरे लोक जुन्या नागवंशाचे वंशज असावेत की काय, अशी शंका त्यांना येते. आर्यांनी द्रविडांना दक्षिणेकडे रेटले, हे मत कर्वे यांना मान्य नाही. त्यांच्या मते, दोघांनीही परस्परांना न रेटता मधल्या नागमुंडखोंडादी लोकांना रेटले. विदर्भ ही फार प्राचीन काळापासून आर्याची वसाहत होती व तेथे त्यांचा संबंध द्रविडांशी आला नसून कोणातरी इतर वन्य जमातींशी आला. विदर्भ ही आर्य आणि नाग किंवा मुंड लोकांच्या संस्कृति-संगमाची भूमी होती. अपरान्त आणि विदर्भ या आर्यांच्या जुन्या वसाहती. त्यांनीच मूलक (पूर्णा खोरे) आणि अश्मक (गोदावरी खोरे) या वसाहती नंतरच्या काळात वसविल्या असाव्यात, असे कर्वे यांचे मत आहे. तेथेही नागमुंडादी लोकांशी त्यांचा संघर्ष झाला असावा, असे त्यांनी सूचित केलेले आहे. कर्वे यांच्या विवेचनातून नागमुंडादी लोक हे महाराष्ट्रातील आद्य वसाहतकार असावेत असे ध्वनित झालेले आहे .

'महाराष्ट्राची वसाहत' या लेखात राजवाडे यांनी दक्षिणारण्यातील नागलोकांचे अस्तित्व मान्य केलेले आहे. त्यांच्या मते बौद्धक्रांतिकाली मगधातील महाराष्ट्रिक लोक दक्षिणारण्यात आले आणि महाराष्ट्रिक व नाग यांच्या मिश्रणातून एक नवे राष्ट्र उदयाला आले. ते म्हणतात, "माहाराष्ट्रिकांचा व नागांचा जेव्हा दक्षिणेत संगम, सहवास व शरीरसंबंध झाला, तेव्हा नागांचा जुनाट वैदिक भाषापभ्रंश व माहाराष्ट्रिकांची महाराष्ट्री ह्या दोन अपश्चष्ट आर्यभाषांचा मिलाफ होऊन दोन्हींच्या लकबा जीत दृष्ट्युत्पत्तीस येतात ती मराठी भाषा जन्मास आली."

प्राचीन भारतात उत्तरापथ आणि दक्षिणापथ असे दोन महामार्ग होते. तक्षशिला, हस्तिनापूर, श्रावस्ती, कपिलवस्तु, वैशाली, राजगीर असा उत्तरापय आणि श्रावस्ती, अयोध्या, वाराणसी, भिलसा, उज्जैन, माहेश्वर, पैठण असा दक्षिणापथ, उत्तरेकडून दक्षिणेकडे गेलेल्या पाच मार्गाचा निर्देश कर्वे यांनी केलेला आहे. पहिला मार्ग बंगालमधून समुद्रकिनाऱ्याने, ओरिसातून जगन्नाथपुरी, कोणार्क, चिलका सरोवर या बाटेने गोदाबरीच्या मुखाजवळ येऊन पोचतो. दुसरा मार्ग छत्तीसगडच्या पठारावरून वैनगंगा व वर्धा यांच्या दोआबात पोचतो. मगध (बिहार), बंग (बंगाल) व कलिंग (ओरिसा) या तीनही देशांतून या मागनि महाराष्ट्रात पोचता येते. तिसरा मार्ग उत्तरेकडून दक्षिणेकडे जाताना भेडाघाट येथे नर्मदा ओलांडतो, चौथा मार्ग तापी नदीवरून जातो. पाचवा मार्ग समुद्राच्या किनाऱ्याने येतो. या पाचही मार्गानी उत्तरेकडून लोक येत राहिले, तसेच दक्षिणेकडचे लोक उत्तरेकडे गेले असावेत. उत्तरेप्रमाणे दक्षिणेकडूनही महाराष्ट्रात लोक शिरत होते. संस्कृतोद्‌भव भाषा बोलणारे लोक, द्राविड भाषा बोलणारे लोक आणि मुंडारी भाषा बोलणारे लोक या तिघांचाही महाराष्ट्रात संघर्ष आणि समन्वय झालेला आहे. "बंशाने मराठी लोक मिश्र युरोपीय वंशाचे असून, मूळ दीर्घमस्तक लोकांच्या वसतीत मध्यम रुंद डोक्याचे कोणी लोक येऊन हे मिश्रण झालेले आहे' असे कर्वे यांनी म्हटलेले असून 'मध्यम रुंद डोक्याचे लोक' हे कदाचित मध्य आशियाच्या पठारावरचे मोंगोलवंशीय असण्याची शक्यता सुचविली आहे

**महाराष्ट्राचा विस्तार**

राजकीय दृष्टीने दक्षिणापथाचे तीन विभाग केले जात होते. पूर्व दक्षिणापथ यात कोसल, महाकोतार, कलिंग, आंध्र, त्रिलिंग आणि वेंगी। मध्य दक्षिणापथात विदर्भ, वत्सगुल्म, भोगवर्धन, मूलक, अश्मक आणि असिक आणि पश्चिम दक्षिणापथात नाशिक, अपरान्त, कोकण, महाराष्ट्र, कर्नाट, कुंतल आणि गंगवाडी या राज्यांचा अथवा जनपदांचा समावेश केला जात असे. आजच्या महाराष्ट्रात यांतील काही प्रदेशांचा समावेश झालेला आहे. प्राचीन काळी मर्यादित भूभागाला 'महाराष्ट्र' म्हणत असत. कालक्रमाने महाराष्ट्राची व्याप्ती वाढत गेलेली आहे. महाराष्ट्र हे नाव कसे आले असावे या विषयी विविध मतमतांतरे आहेत.

'महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र' असे मोल्सवर्थकृत कोशाच्या प्रस्तावनेत डॉ. जॉन विल्सन यांनी म्हटलेले आहे. महार हेच महाराष्ट्राचे मूळचे रहिवासी होत, हे त्यांचे मत केतकरांनीही मान्य केलेले आहे. महार आणि रठ्ठ या दोन राष्ट्र जातींच्या नामांचा संयोग होऊन 'महाराष्ठ' असे रूप तयार झाले आणि त्याचे पुढे महाराष्ट्रिक, कालांतराने महाराष्ट्र असे संस्कृतीकरण झाले भांडारकरांनी 'रास्टिक' (राष्ट्रिक) या महाराष्ट्रातच वसती करून असलेल्या लोकांच्या नावावरून महाराष्ट्र हे नाव सिद्ध झालेले दाखवले आहे. राष्ट्रिक, रठिक हे आपणाला महाराष्ट्रिक, महारठिक म्हणवून घेऊ लागले. महारठींचा देश तो महारठ्ठ आणि महारठ्ठाचे संस्कृत रूप महाराष्ट्र राजवाडे यांच्या मते उत्तरेतले रह नावाचे लोक महाराष्ट्रात आले. मानव्य, हैहय, भोज, यादव, नल, कदंब, मौर्य, चालुक्य इत्यादी शेकडो गोत्रांचे रट्ट दंडकारण्यात शिरले. या रट्टांचेच राष्ट्रिक, महाराष्ट्रिक झाले तुळपुळे यांच्या मते गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र, अपरान्त, विदर्भ व अश्मक ही एकूण सहा राष्ट्रे आर्यांनी दक्षिणेत वसविली व त्या सर्वांचे मिळून पुढे महाराष्ट्र बनले. पां. वा. काणे यांनी 'महान राष्ट्र ते महाराष्ट्र' अशी उपपत्ती दिलेली आहे. 'महंत राष्ट्र भणौनि महाराष्ट्र' असे श्री चक्रधरांनी म्हटलेले आहे, त्याच्याशी काणे यांची उपपत्ती जुळणारी आहे.

प्राचीन काळच्या महाराष्ट्राचा विस्तार कसकसा झाला असावा, याविषयी केतकरांनी विवेचन केलेले आहे. त्यांच्या मते दंडकारण्यास हळूहळू महाराष्ट्र हे नाव लागू लागले. कवी राजशेखराने विदर्भाचा महाराष्ट्रात अंतर्भाव केलेला दिसतो. वैदर्भीयांनी दंडकारण्य या नावाचादेखील स्वीकार केला.

महाराष्ट्राची क्षेत्रमर्यादा वाढत गेलेली दिसते. सतराव्या शतकातील डिंभ कृष्णमुनी या महानुभावीय कवीने केलेले विधान वर दिलेले आहेच. महानुभावांच्याच 'आचारपद्धती' या सतराव्या शतकातील ग्रंथात म्हटले आहे: 'देश भणिजे खंडमंडळ जैसे फलेठाणापासीनि दक्षिणेसि: महाटी भाष जेतुला ठाई वर्ते तेतुले एक मंडळ : तयासि उत्तरे बालेघाटाचा सेवट ऐसे एक खंडमंडळ मग उभे गंगातीर तेहि एक खंडमंडळ आणि तयापासौनि मेघंकरघाट ते एक खंडमंडळ तयापासौनि आवघे वराड ते एक खंडमंडळ: परि आवधी मिळौनि महाराष्ट्रचि बोलिले: किंचित किंचित भाषेचा पालट भणीनि खंडमंडळे भणावी. दक्षिणापथाचा एक भाग असलेल्या मूळच्या महाराष्ट्राने दक्षिणापथातील इतर वसाहतींना सामावून घेतले आणि आपला क्षेत्रविस्तार केला. हा विस्तार एका विशिष्ट कालखंडात घडलेला नसून वेळोवेळी ज्या राजवटींनी महाराष्ट्रात राज्य केले त्यांच्या काळात झालेला आहे.

दक्षिणापथावर सातवाहन (इ.स. पूर्व २३० ते इ.स. २३०), वाकाटक (इ.स. २५० ते ५२५), चालुक्य (इ.स. ५५० ते ७६० आणि ७९३ ते ११८०), राष्ट्रकूट (इ.स. ७५३ ते १७५) आणि यादव (इ.स. ११८९ ते १३१०) या महाराष्ट्री प्राकृत, कन्नड आणि मराठीभाषक राजवंशांच्या राजवटींनी राज्य केले. या राजवटींच्या काळात सांस्कृतिक दृष्ट्या महाराष्ट्राचा गुरुत्वमध्य दक्षिणापबाच्या मध्यास होता हे नंदिवर्धन, कुंडिनपूर, प्रवरपूर, वत्सगुल्म, देवगिरी, पैठण, कल्याणी, मालखेड व बदामी या राजधान्यांच्या मालिकेवरून दिसून येते (शेजवलकर त्र्यं. शं, १९६४), शेजवलकर यांच्या मते दक्षिण महाराष्ट्रावर कर्नाटक संस्कृतीची छाप खोलवर उमटलेली आहे, त्याप्रमाणे उत्तर कोकण व महाराष्ट्र यांवर गुर्जर संस्कृतीचा ठसा उमटलेला आहे. पूर्वेकडील आंध्रसंस्कृतीचाही परिणाम मराठ्यांवर झालेला दिसतो. कर्वे यांनीही 'नुसते प्रादेशिक दृष्ट्याच नव्हे तर सांस्कृतिक दृष्ट्याही मराठी समाजाचे स्थान उत्तरीय व दाक्षिणात्य समाजांच्या मधले आहे' असे मत दिलेले आहे. सातवाहन ते यादव या काळात महाराष्ट्री प्राकृतातून मराठीचा उदय झाला, त्याचप्रमाणे ब्राह्मी लिपीतून देवनागरी लिपी उत्क्रान्त झाली.

आद्य पुराश्मयुग, मध्य पुराश्मयुग, उत्तर पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्मयुग, ताम्रयुग, ब्राँझयुग असे मानवी संस्कृतीच्या विकासाचे टप्पे आहेत. महाराष्ट्रात नवाश्मयुगीन संस्कृतीचा उदय इसवी सनाच्या २००० वर्षांपूर्वी, ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा उदय १६०० वर्षांपूर्वी, महापाषाणीय - लोहयुगीन संस्कृतीचा उदय ७०० वर्षांपूर्वी झाला. इसवी सनाच्या ६०० वर्षांपूर्वी भारतात ऐतिहासिक काळाची सुरुवात झाली असे मानले जाते. दक्षिणापथाच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासाशी भारताच्या इतिहासाचा संबंध असल्यामुळे तो इतिहास पाहिला पाहिजे.

इ.स. पूर्व सहावे शतक हे एकूणच मानवी इतिहासातील एक महत्त्वाचे शतक आहे. या शतकातल्या भारतात वेगवेगळे विचारसंप्रदाय उदयाला आले. पाली ग्रंथांनुसार बौद्ध धर्माच्या उदयकाळी ६२ संप्रदाय अस्तित्वात होते, तर जैन मतानुसार ३६३ संप्रदाय होते. निगंठ नातपुत्त म्हणजे जैन मताचे तीर्थंकर महावीर आणि आजीवक पंथाचे मक्खली गोसाल हे गौतम बुद्धाचे समकालीन होते. त्याशिवाय पूरण कस्सप, अजित केशकंबली, पकुध कात्यायन, संजय बेलडिपुत यांचाही बुद्धाच्या समकालीन तत्त्ववेत्त्यांमध्ये समावेश होतो. अजित केशकंबली यांनी भौतिकतावादी सिद्धान्ताचा प्रचार केला. चांगल्या किंवा वाईट कर्माचे कोणतेही फळ मिळत नाही. मनुष्याने काहीही केले तरी मृत्यूनंतर त्याचे शरीर पंचमहाभूतांमध्ये विलीन होऊन जाते. काहीही शिल्लक राहत नाही. पाप आणि पुण्य, दान आणि दया यांचा माणसाच्या नियतीशी काहीही संबंध नसतो, हे त्यांचे विचार होते. पकुध कात्यायन यांनी पंचमहाभूतांमध्ये सुख, दुःख आणि जीव यांची भर टाकली. या गोष्टीदेखील निर्माण करता येत नाहीत किंवा त्यांना नष्टही करता येत नाही. पूरण कस्सपाने, आत्मा शरीराहून निराळा असतो, हे मत मांडले. मक्खली गोसालचे मत होते, आत्म्याला अनेकानेक पुनर्जन्मांमध्ये पूर्वनिर्धारित अटळ चक्रांतून जावेच लागत असते. संजय बेलट्ठिपुताच्या मते, परलोक, जीवाचे कारण, पापपुण्य, पुनर्जन्म इत्यादी प्रश्नांची 'अस्ति'/'नास्ति' अशी दोन्ही पक्षी उत्तरे संभवतात, दोन्ही पक्षांचे पूर्ण निराकरण होत नाही, त्यामुळे निर्णय लागत नाही. मक्खली गोसालाच्या संप्रदायाला 'आजीवक' पंथ असे नाव आहे. 'मानवी प्रयत्न हे निरर्थक आहेत' हे आजीवकांचे मूळ तत्त्व होते. बुद्धकालीन भारतात असे विविध विचारसंप्रदाय होते. पुढच्या काळात जैन आणि बौद्ध धर्माचा विशेष प्रसार झाला. तथापि, महावीर आणि बुद्ध यांच्या समकालीनांमध्ये मक्खली गोसाल हा विशेष महत्त्वाचा मानला जातो.

इ.स. पूर्व सहाव्या शतकाच्या सुमारास छोटी गणराज्ये, जनपदे नाहीशी होऊन मोठ्या साम्राज्यात त्यांचा समावेश होऊ लागलेला होता. संपूर्ण स्वायत्तता अनुभवणाऱ्या छोट्या जमाती राज्यतृष्णेमुळे नष्ट होऊ लागल्या होत्या. त्या युगात घडत असलेल्या महाकाय ऐतिहासिक रूपांतराचा छोट्या जमातीच्या समाजव्यवस्थेचा नाश आणि साम्राज्य सत्तेने प्रसूत केलेली नवी मूल्ये यांचा अर्थ समजून घेण्याचा हा काळ होता. हे तत्त्ववेत्ते छोट्या जनजातींमधून आलेले होते. त्यांची मुळे आदिम समाजात रुजलेली होती. त्यांच्या डोळ्यांसमोरच त्यांचे समाज कोसळत चाललेले होते. सबंध समाजच अस्वस्थ, अशांत आणि दुःखग्रस्त झालेला होता. बुद्धकालीन भारतातले तत्त्ववेत्ते ज्या जगात आपण राहतो आहोत ते जग समजून घेण्याचा प्रयत्न करीत होते. वंशपरंपरेने चालत आलेल्या संस्था नाहीशा होत आहेत आणि अन्याय व असत्यावर आधारित नव्या शक्ती त्या जागी येत आहेत, मानवी संबंध असंबद्ध ठरलेले आहेत हे त्यांना दिसत होते. त्यांना आपल्या भोवतीचे वास्तव समजून घ्यायचे होते. जैन धर्माचा आणि नंतरच्या काळात अतिशय व्यापक प्रमाणात बौद्ध धर्माचा प्रसार होण्याची कारणे त्या समाजव्यवस्थेत निहित होती.

भारतीय संस्कृतीमध्ये ब्राह्मण आणि श्रमण अशा दोन मुख्य प्रवृत्ती आहेत: ब्राह्मण प्रवृत्तीचा समावेश वैदिक परंपरेत आणि श्रमण प्रवृत्तीचा अवैदिक परंपरेत केला जातो. जैन, बौद्ध आणि तत्सम काही प्रवृत्ती अवैदिक मानल्या जातात. जैन व बौद्ध हे अवैदिक संप्रदाय वेदपूर्व अवैदिक संस्कृतीतून जन्मले अशी उपपत्ती मांडली जाते. तथापि, लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते, वैदिक परंपरेपासून जैन व बौद्ध यांनी घेतलेले ऋण दृष्टिआड होऊ शकत नाही. बुद्धाच्या उदयाच्या काळी चातुर्वर्ण्य संस्था स्थिरावू लागली होती. जातिसंस्था दृढ होऊ लागली होती. ब्राह्मण व क्षत्रिय यांची धार्मिक व राजकीय सत्ता स्थापन झाली होती. ब्राह्मणांबरोबरच वेदपूर्वकालापासून स्थिरावलेला विविध संप्रदायांचा श्रमणवर्गही प्रभाव गाजवीत होता. विश्वाचे स्वरूप, धार्मिक कर्मकांड, योग व संन्यास यासंबंधी विविध विरुद्ध मते सांगणारे चिकित्सक, विचारवंत आपापली मते ठासून सांगत होते. यांत नास्तिक, आस्तिक व संशयवादी असे अनेक संप्रदाय होते. ब्राह्मण व श्रमण यांचे फिरते संघही यांमध्ये होते. या सर्वांमध्ये मुख्य दोन पक्ष होते. ऐहिक व पारलौकिक भोगाच्या प्राप्तीकरता यज्ञसंस्थेच्या पुरस्कर्त्यांचा पक्ष आणि देहक्लेशरूप तपश्चर्येला प्राधान्य देणारा अवैदिक तपस्वी श्रमणांचा पक्ष लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते, या सर्व मतभेदांना व संप्रदायांना बगल देणारा, माणसांचा आध्यात्मिक रोग (म्हणजे सुखदुःखांचे इंद्र) व त्यातून निर्माण होणारी निरंतर चिंता आणि या चिंतेतून बाहेर पडण्याचा म्हणजे परमशांतीचा उपाय सांगणारा एक वैद्यराज पुढे आला. तो म्हणजे गौतम बुद्ध दामोदर धर्मानंद कोसंबी यांनी म्हटले आहे, अनियंत्रित व्यक्तिवादी आत्मासक्ती आणि निरर्थक तापसी शरीरदंड बौद्ध धर्म या दोन टोकांच्या मधला मार्ग होता. त्यामुळे बौद्ध धर्माचे सतत उत्थान होत गेले आणि तो मध्यम मार्ग म्हणून ओळखला जाऊ लागला.

**बौद्ध आणि जैन धर्म**

भगवान बुद्धांचे महानिर्वाण इ.स. पूर्व ४८३ मध्ये झाले. त्याच काळात कोसल देशाचा राजा पसेनदी याचाही मृत्यू झाला. दोघांनाही ८० वर्षांचे आयुष्य लाभले होते. भगवान महावीर यांचे त्यानंतर, अंदाजे इ.स. पूर्व ४६८ मध्ये महानिर्वाण झाले. मगध देशावर बिंबिसार याची सत्ता इ.स.पूर्व सुमारे ५४० च्या आसपास होती, त्यानंतर अजातशत्रू इ.स. पूर्व ४९२ मध्ये, तर महापद्म नंद इ.स. पूर्व ३५० च्या आसपास सत्तेवर आला.

बौद्ध धर्माचा विस्तार आणि तत्कालीन भारताची भौगोलिक स्थिती या संदर्भात प्रकाश टाकणारी 'सुत्तनिपात'मधली एक कथा वामोदर धर्मानंद कोसंबी यांनी दिलेली आहे (कोसंबी, १९९३: १४४), ती अशी: बुद्धाच्या हयातीत कोसल देशातला बावरी नावाचा ब्राह्मण राजधानी श्रावस्ती सोडून दक्षिणापथाला निघून गेला. तो आपल्या शिष्यांसह गोदावरीच्या खोऱ्यातील अस्सकांच्या प्रदेशात जाऊन राहिला. तिथे फळे, कंदमुळे आणि बनज धान्य गोळा करून ते उदरनिर्वाह करीत, हळूहळू तिथे बसती झाली. बाबरीने यज्ञाचे आयोजन केले. यज्ञसमाप्तीच्या वेळी तिथे एक ब्राह्मण आला आणि त्याला काही न मिळाल्याने त्याने बावरीला शाप दिला. तेव्हा बावरीने आपल्या सोळा शिष्यांना बुद्धाकडे पाठवले. बावरीचे शिष्य आधी पैठणला गेले. तिथून ते क्रमशः महेश्वर, उज्जयिनी, भिलसा, साकेत, कोसंबी, सावत्थी असे दक्षिणापथाने गेले. त्यानंतर ते उत्तरापथाने सेतव्या, कपिलवस्तु, कुसीनारा, पावा, भोगनगर, वैशाली असे जात राजगीरला पोचले. नंतर ते शिष्य बुद्धाला भेटले.

कोसंबी यांच्या मतानुसार बावरीच्या कथेवरून उत्तरेकडून दक्षिणेकडे येण्या-जाण्याचा मार्ग समजतो, तसेच इ.स. पूर्व सहाव्या शतकाच्या मध्यापर्यंत गोदावरीच्या खोऱ्यात शेती केली जात नव्हती हेही कळते. त्यानंतर तिथे वसत्या होऊ लागल्या, उत्तरेकडच्या लोकांकडून इथे वसती करून राहणारांना लोखंडाची आणि लोखंडी अवजारांची व नांगराच्या वापराची माहिती समजली असेल. नागपूरजवळ पेंच नदीकाठी असलेल्या नैकुंड येथे केलेल्या उत्खननात लोखंड शुद्ध करण्याच्या भट्टीचा पुरावा मिळालेला आहे. पुरातत्त्ववेत्त्यांच्या मते इ.स. पूर्व पाचवे शतक हा या भट्टीचा कालखंड असावा, विदर्भातून महापाषाणयुगीन लोक गोदावरीच्या खोऱ्यात आले. त्यांच्याजवळ लोखंडी हत्यारे आणि चपळ घोडे होते, असाही एक तर्क आहे. ही महापाषाणयुगीन लोहयुगीन संस्कृती महाराष्ट्रात इ.स. पूर्व १०००-५०० या काळात नांदत होती. बावरीच्या कथेवरून आणखी एक गोष्ट समजते, ती म्हणजे बुद्धाच्या हयातीतच त्याची ख्याती दक्षिणापथात पसरलेली होती. बुद्धकाळात महाराष्ट्र प्रागैतिहासिक काळातून बाहेर पडला व प्राचीन ऐतिहासिक काळात त्याचा प्रवेश झाला.

महाराष्ट्रात विविध ठिकाणी झालेल्या उत्खननातून शेतीचे पुरावे मिळालेले आहेत. वसंत शिंदे यांच्या मते, महाराष्ट्रात शेती व्यवसायाला सुरुवात सुमारे इ.स. पूर्व २००० च्या दरम्यान ताम्रपाषाणयुगीन लोकांनी केली. तापी, गोदावरी, भीमा या नद्यांच्या खोऱ्यात क्रमशः वसाहती झाल्या. या आद्य शेतकऱ्यांनी लोखंडी नांगराच्या अभावी लाकडी नांगरांचा वापर केला असावा (शिंदे, वसंत, १९८८: २३-२८). मौर्य-सातवाहनकालातील महाराष्ट्राचे रहिवासी शेती व शिकार करून उपजीविका करीत. नेवाशाला करडई, गहू, हरभरा, नाचणी, वाल, वाटाणा, ज्वारी इत्यादी धान्य जळालेल्या स्वरूपात मिळाले. बहाळला मिलेट व तांदूळ सापडले. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर येथे मौर्य-सातवाहनकालात गहू, तांदूळ, व द्विदल धान्ये पिकवीत असत. विदर्भात कौण्डिन्यपूर येथे तांदूळ, मका व पवनार येथेही तांदूळ, नाचणीसारखी धान्ये लोकांच्या आहारात होती, असे आढळून आले आहे (देव, शां. भा.. १९६८ : ५५), इनामगाव व दायमाबाद येथील उत्खननात मिळालेल्या जळालेल्या धान्यावरून तत्कालीन शेतकरी सातू, चणा, गहू, पावटा, तांदूळ, उडीद, कुळीच, मूग इत्यादी धान्ये घेत असावेत असे दिसते

बुद्धाच्या निर्वाणानंतर बुद्धमताचा प्रसार होऊ लागला होता. त्या काळाच्या आसपासच वैष्णव मत अथवा कृष्णभक्ति-पंथाचा प्रसार होऊ लागला. जैन मतही दूरपर्यंत पोचले होते. मौर्य साम्राज्याचा उदय इ.स. पूर्व ३२५ च्या आसपास झाला. चंद्रगुप्त मौर्यानंतर (इ.स. पूर्व ३२१- २८४) अशोकाच्या (इ.स. पूर्व २७५-२३२) हाती सत्ता आली. अशोकाच्या साम्राज्याची सीमा त्याने खोदवलेल्या शिलालेखांवरून समजते. अशोकाचे दोन शिलालेख महाराष्ट्रात आढळतात. एक सोपारा (शूर्पारक) येथे आणि दुसरा देबटेक (जि. चंद्रपूर) येथे. अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी महाराष्ट्रात धर्ममहामात्र आणि धर्मरक्षित यांना पाठवले होते. अशोकाच्या काळात महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार झाला तसाच वेगवेगळ्या प्रदेशांशी व्यापारही वाढला. सोपारा, कल्याण, ठाणे, चौल, महाड, मांदाड, राजपुरी व घोडेगाव ही बंदरे जुन्नर, नाशिक व पैठण यांसारख्या व्यापारी केंद्रांशी जोडली गेली. नाणेघाट, बोरघाट, शेरघाट, थळघाट हे घाटमार्ग अस्तित्वात आले. व्यापारी मार्गांवर बौद्ध लेणी निर्माण झाली. अशोकाने नगरे वसवली, स्तूप बांधून घेतले, स्तंभ उभे केले. सर्वसामान्य जनतेला स्वीकार करता येईल अशा धर्मतत्त्वांचा प्रसार केला.

बौद्ध धर्माच्या प्रसारकांसाठी महाराष्ट्राची भूमी, विशेषतः दक्षिणी कातळ विशेष उपयोगाचा ठरला. येथे जमिनीवर बांधकाम करण्याचा प्रश्न नव्हता, दगड कोरायचा होता. पर्वताची एखादी बाजू निवडल्यानंतर प्रथम दर्शनी भागाचा आराखडा तयार करीत. छतापासून कोरण्याच्या कामाला सुरुवा करीत. आधी कळस आणि मग पाया अशी पद्धती असावी असे दिसते. नंतर खालचा भाग कोरून काढीत. आवश्यक असलेले स्तंभ पाषाणातून कोरत. सर्वांत शेवटी तळची भूमी. पिकाव, छिन्नी आणि हातोडा या हत्यारांच्या साहाय्याने ही पाषाणगुहाशिल्पे घडविली जात. आत्यंतिक संयम आणि दक्षता, अचूकपणा आणि कलाकुशलता या गोष्टींशिवाय ही पाषाण-शिल्पे अथवा स्थापत्ये घडवणे शक्य झाले नसते. त्या काळी कारागीर आणि कलावंत असा काही भेद नसावा. दुसरी गोष्ट म्हणजे, पाषाणशिल्पांची ही निर्मिती सांघिक अथवा सामूहिक होती. त्यामागे धर्म ही मुख्य प्रेरणा होती. सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार या राजवटींमध्ये बौद्ध धर्माच्या प्रसाराला पोषक असे बातावरण होते. व्यापारी आणि आसपासच्या धनिकांकडूनही देणग्या मिळत असत. घेनुकाकट येथील अनेक यवन व्यापाऱ्यांनी दाने दिल्याचे उल्लेख

कार्ले, शेलारवाडी येथल्या लेण्यांमध्ये कोरलेले आढळतात. सातवाहन काळात बाहेरून आलेल्या यवन, शक, पह्लव यांच्या टोळ्यांतील कित्येकांनी येथे वास्तव्य केले आणि त्यांनी येथल्या धर्माचा स्वीकार केला. नाशिक येथील लेण्यात यवन धम्मदेवाचा पुत्र इंद्राग्निदत्त याच्या दानाचा उल्लेख आहे, कार्ले येथे सीहधय आणि धम्म यांच्या दानाचा उल्लेख आहे, नाशिक येथील लेण्यात एका शकनिकेचा उल्लेख आहे. शकवंशी ऋषभदत्त अथवा उषवदात हा क्षहरातवंशीय महाक्षत्रप नहपान याचा जावई होता. नहपान क्षत्रपाने सातवाहनांशी अनेकदा युद्धे केली. सातवाहनांची पहिली राजधानी जुन्नर ही जिंकून त्यांना पैठणकडे जायला लावले. पुढे गौतमीपुत्र सातकर्णीने नहपानाचा पराभव केला. डॉ. वा. वि. मिराशी यांच्या मते नहपान हे नाव पक्कवी असावे, ऋषभदत्त स्वत्तःस शक म्हणवितो, त्यावरून त्या काळी शक आणि पक्लव या जमातींचे मिश्रण झालेले असणे शक्य आहे. नहपान आणि ऋषभदत्त हे शक-पक्त्व असले तरी येथे राज्य करीत असताना त्यांनी येथल्या धर्मानुयायांना पोषक अशी कामे केली. ऋषभदत्त आणि त्याची पत्नी दक्षमित्रा यांचा बौद्ध धर्माला उदार आश्रय होता हे दिसून येते.

कार्ले येथील चैत्यगृहात एक जोडपे कोरलेले आहे. ते ऋषभदत्त आणि दक्षमित्रा यांचे शिल्प असावे अशी एक कल्पना आहे. पुरुषोत्तम शिवराम रेगे यांची या संदर्भातली एक कविता आहे 'तेव्हापासून', ती अशी आहे: 'आणि। मी ऋषभदत्त होतों तेव्हां । कार्त्यांचीं तीं लेणीं। कोरवून घेतांना। स्थपति जनार्दन म्हणाला, 'दोघांच्याहि प्रतिमा असायला हव्यात, तेंच समुचित होईल। मलाहि ते पटले. पण सानुमती म्हणाली, 'मी तिथे आंतच नाहीं का। गाभाऱ्यांत, सद्धेश्वराची पूजा करीत? बाहेर कशी उभी असणार?' आणि तेहि खरें होतें. मला एकट्यालाच । भिंतीशी उभे रहायला हवें होतें। हा सगळा दिव्य चमत्कार न्याहाळीत आलों तसा एकटा, निःसंग, तरीहि स्थपतीला मी म्हणालों, 'काम तुमचे आहे, तुम्हांला जें योग्य वाटतें। तें करा! आणि। सगळे पूर्ण झालें। आणि पाहिलें। तों आणखीच एक चमत्कार होता. मी एकटा नव्हतों; कुणीच एकटें नव्हतें. सानुमतीच सगळीकडे होती. ऋषभदत्ताचा हात। तिथे। तिच्या खांद्यावर। सहज विसावलेला होता. जनार्दन म्हणाला, 'सद्धेश्वरहि। महाराज्ञीविना रहायला। तयार नव्हता. तोहि । तुम्हीच होऊन। उभा राहिला मग। गाभाऱ्यांतून बाहेर येऊन.' आणि हें असें। तेव्हांपासून जन्मोजन्म.' दक्षमित्रा ही रेगे यांच्या कवितेत सानुमती झालेली आहे (रेगे, १९८४, 'अनीह ८२). भाजे येथील लेणी ही महाराष्ट्रातली अत्यंत प्राचीन लेणी मानली जातात. त्यानंतर शंभरेक वर्षांनी कार्ले येथे लेणी कोरली गेली असावी. बौद्ध धर्मातील महायान शाखेपूर्वी निर्माण झालेल्या लेण्यांमध्ये बुद्धप्रतिमा नाही. स्तूप आणि चैत्यगृह आहेत. गांधारदेशीय कुषाणवंशीय राजा कनिष्काच्या काळात (पहिले-दूसरे शतक) भरलेल्या चौथ्या महासंगीतीमधून महायानाचा जन्म झाला. त्यानंतर बुद्धप्रतिमा आणि बुद्धचरित्रातील प्रसंगांचे चित्रण होऊ लागले. बुद्धप्रतिमांनी दागोबाचे स्थान घेतले. पुढे सातव्या- आठव्या शतकात महाराष्ट्रात वज्रयान या शाखेचा प्रवेश झाला, कान्हेरी, नाशिक, पितळखोरे, अजिंठा, औरंगाबाद आणि वेरूळ येथील लेण्यांमध्ये वज्रयानाचा तसेच तंत्राचाही प्रभाव दिसतो. महाराष्ट्रातील लेण्यांमध्ये हीनयान, महायान आणि वज्रयान अशा तीनही शाखांच्या प्रभावातून निर्माण झालेली लेणी आहेत. इसवी सनाच्या अकराव्या शतकापासून पुढे बौद्ध धर्माचा प्रभाव अस्पष्ट होत गेलेला असला तरी त्या धर्माची तत्त्वे धूसर झाली अथवा विसरली गेली असे झाले नाही. तेरा-चौवा शतके ज्या धर्माच्या तत्त्वांचे संस्कार येथल्या मनांवर झालेले होते ते येचल्या लेखकांच्या साहित्यातून न उमटणे अशक्यच होते. महाराष्ट्राच्या कातळात कोरलेली बौद्ध स्थापत्य-शिल्पे तर काळाला, उन्हापावसाला न जुमानता अद्याप टिकून आहेत. त्यांतले सौंदर्यसर्जन आमच्या कलादृष्टीचे पोषण करणारे आहे. आपला वारसा जर कोणता असेल तर तो हाच आहे.

महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रवेश सम्राट अशोक मौर्याच्या काळात म्हणजे ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकाच्या मध्याच्या सुमारास झाला. अशोकाच्या कारकिर्दीत महास्थविर मोग्गलीपुत्त तिस्साने निरनिराळ्या देशांत धर्मप्रसारक पाठवून बौद्ध धर्माचा प्रसार करण्याचे ठरवले. तेव्हा महाधर्मरक्षित महाराष्ट्रात आला आणि त्याने तेरा इजार लोकांना भिक्षु केले, असे 'महावंसा'त म्हटलेले आहे. यातली अतिशयोक्ती जमेस धरूनही अशोकाच्या काळात महाराष्ट्रातल्या दूरदूरच्या भागांत बौद्ध धर्म पोचला होता असे दिसते. चंद्रपूर जिल्ह्यातील देवटेक या गावी ब्राह्मी लिपीतील एक लेख सापडलेला असून त्यात प्राण्यांची हिंसा करू नये अशी स्वामींची आज्ञा असल्याचे म्हटलेले आहे. हा स्वामी अशोकच असावा, असे डॉ. मिराशी यांचे मत आहे.

महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार होऊ लागल्यावर भिक्षूची संख्या वाढू लागली. त्यांना राहण्यासाठी विहार, धर्मप्रसारकांसाठी चैत्यगृहे किंवा गंधकुटी आणि पूजेसाठी स्तूप पर्वतांतून कोरण्यात आले. महाराष्ट्रातली लेणी ही महाराष्ट्रात झालेल्या बौद्धधर्मप्रसाराची चिन्हे होत. ही लेणी कोरण्यासाठी महाराष्ट्रातला काळा कातळ उपयुक्त ठरला. महाराष्ट्रातल्या लेण्यांची संख्या जवळजवळ हजारएक आहे. अजिंठा आणि वेरूळ ही तर जगप्रसिद्ध ठिकाणे आहेत; त्याशिवाय भाजे, कोंडाणे, पितळखोरे, बेडसे, नाशिक, जुन्नर, कार्ले, कान्हेरी, औरंगाबाद, कुडा, कराड, महाड, सुधागड, शेलारवाडी, शिरवळ, वाई, कोळ आदी ठिकाणी लेणी कोरलेली आहेत. ही बहुतेक ठिकाणे व्यापारी मार्गावर होती. कोसंबी यांनी दाखविल्याप्रमाणे एक मार्ग पश्चिम घाटाच्या पायथ्याकडून नाणेघाटातून जुन्नरकडे जाणारा होता. या मार्गावर हाळ, आंबिवले, पालु-सोनावळे या गुहा आहेत. इथून बेडशाकडे जाणारी वाट असावी. दुसरी खंडाळ्याकडे येणारी असावी. दुसऱ्या वाटा मावळाकडे जाणाऱ्या असाव्यात; कार्ले, भाजे आणि शेलारवाडी गुहा या मार्गावर आहेत. कोळ आणि महाडमार्गे कुड्याकडे जाणारी वाट असावी. विद्या देहेजिया यांच्या 'अर्ली बुद्धिस्ट रॉक टेम्पल्स' या पुस्तकातल्या नकाशावरून दिसते की पश्चिम घाटाच्या लगत आणि आसपास लेण्यांचा एक समूह आढळतो तर दुसरा गोदावरीच्या पलीकडे आढळतो. केल (Kail, Owen C., 1975: 4) यांनी बुद्धिस्ट केव्ह टेम्पल्स ऑफ इंडिया' या पुस्तकात व्यापारी मार्गाचा जो नकाशा दिलेला आहे त्यावरून एक मार्ग कल्याण ते सोपारा, सुरत, भडोचवरून उज्जयिनीकडे जाणारा आहे. उज्जयिनीवरून येणारा एक मार्ग महिष्मतीवरून येतो आणि घटोत्कच, बहाळवरून नाशिककडे जातो. नाशिकडून एक मार्ग कल्याणकडे जाणारा तर दुसरा जुन्नर, शेलारवाडीकडे जाणारा आहे. बहाळवरून पितळखोरे, वेरूळ, औरंगाबाद, पैठण आणि पुढे तेरकडे जाणारा एक मार्ग आहे. दुसरा मार्ग घटोत्कचवरून येणारा आणि भोकरदन, औरंगाबाद, नेवासे, शेलारवाडीकडे जाणारा आहे. कल्याण ते शेलारवाडी या मार्गावर कोंडाणे, कार्ले, भाजे आणि बेडसे येथील गुहा आहेत. विदर्भात पवनी येथे बौद्ध धर्माचे मोठे केंद्र होते असे उत्खननातून आढळले आहे. तेथे दोन स्तूप आढळले असून त्यांपैकी एक सांची, भारहूत येथील स्तूपांशी साम्य दर्शविणारा आहे. पवनी येथे उत्खननातून आढळलेले हे बांधकाम मौर्य-शुंग काळातले असावे, असे संशोधकांचे मत आहे.

पर्वतात कोरलेली ही लेणी तीन प्रकारची आहेत. स्तूप, विहार आणि चैत्यगृह. स्तूप म्हणजे ढिगारा. मुळात अंत्यक्रियेशी निगडित, राख आणि अस्थींचा ढीग. बुद्धपूर्व काळात अंत्यक्रियेनंतर असे स्तूप उभारण्याची प्रथा होती. आपल्या अस्थिशेषांवर चौरस्त्याच्या ठिकाणी असे स्तूप उभारले जावेत, असे भगवान बुद्धाने म्हटले होते. मृताच्या अस्थिरक्षेवर स्तूप उभारण्याची प्रथा सगळीकडे असली तरी बौद्ध धर्मात ते पूजेचे स्थान बनले. लहानशा मातीच्या ढिगापासून भव्य स्थापत्यकृतीपर्यंत त्यांचा वेगवेगळ्या रूपांमध्ये आविष्कार झालेला दिसतो. स्तूप हा दागोबा अथवा धातु-गर्भ या नावानेही ओळखला जातो.

आपल्या गर्भात अस्थिशेष धारण करणारी रचना म्हणजे धातु-गर्भ अथवा दागोबा, चैत्य (चितेपासून निघालेला शब्द) हा शब्दही स्तुपाचा निर्देश करताना वापरला जात असे, परंतु चैत्य शब्दाला मंदिर, पवित्र वृक्ष आणि बुद्धप्रतिमा असा व्यापक अर्थ आलेला आहे. विहार हे भिक्षूंना राहण्यासाठी, विशेषतः पावसाळ्यात आश्रयासाठी कोरले गेले. सुरुवातीच्या काळात भिक्षुची ही आश्रयस्थाने बांबू आणि लाकूड यांचा उपयोग करून तयार केलेल्या झोपड्या असत. पुढच्या काळात त्यांत बदल होत गेला आणि प्रशस्त विहार तयार झाले. दगडात कोरलेल्या या विहाराच्या कोरीव कामात लाकडी बांधकामाचे अनुकरण आढळते. विहारांत भिक्षूना प्रार्थनेसाठी सभागृह असे, त्याचप्रमाणे झोपण्याची जागा, स्वयंपाकघर आणि धान्यादी वस्तू साठविण्याची खोलीही असे. विहारांच्या मालकीच्या शेतजमिनी असत. शेती केली जात असे आणि पिकलेले धान्य शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना विकले जात असे, कर्जे दिली जात आणि दुष्काळाच्या वेळी उदारतेने मदतही करीत. चैत्यगृह ही मुख्यतः प्रार्थनेची, पूजेची जागा होय. स्तूप आणि त्याभोवती केलेले बांधकाम अशी रचना दिसते. वर छत्र नसलेले आणि भोवती भिती नसलेले स्तूपही असत. नंतरच्या काळात आत स्तूप असलेली चैत्यगृहे कोरली गेली असावीत. चैत्यगृहे वर्तुळाकार, अर्धवर्तुळाकार घुमटासारखी अथवा चौकोनी अशी तीन प्रकारची आढळतात. जुन्नर येथे वर्तुळाकार, बेडसे येथे अर्धवर्तुळाकार चैत्यगृहे आढळतात. विदर्भातील पवनी हे केंद्र वगळता बहुतेक रचना दगडात कोरलेल्या आहेत. इसवी सनाच्या आधी तिसऱ्या शतकापासून इसवी सनाच्या दहाव्या

शतकापर्यंत हे कार्य निरंतर चालत राहिले. इ.स. पूर्व १९० च्या आसपास मौर्य साम्राज्याचा अस्त झाला. मौर्य घराण्याच्या अस्तानंतर शुंग घराण्याकडे सत्ता आली. शुंगांनी पुन्हा यज्ञप्रयेची सुरुवात केळी, पुष्यमित्र शुंग बौद्ध धर्माचा विरोधक होता. परंतु स्तूपांच्या निर्मितीत त्याने अडथळा आणला नाही. शुंगांना ग्रीक आक्रमकांशी युद्धे करावी लागली. ग्रीकांचे आक्रमण रोखण्यात त्यांना बरेच यश आले. अशोकाच्या काळात सांची हे बौद्ध धर्माचे प्रसिद्ध ठिकाण होते तसे अग्निमित्र शुंगाच्या काळात विदिशा हे भागवत धर्माचे प्रसिद्ध क्षेत्र होते. बौद्ध धर्माच्या प्रसाराचा इतिहास आणि शुंग कलाशैलीचा विस्तार या दृष्टीने पवनी (जि. भंडारा) येथील उत्खनन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. उत्खनित पुराव्यानुसार मूळचा स्तूप अशोकपूर्व काळामध्ये बांधला गेल्याचे व त्यानंतर शुंग कालामध्ये या स्तूपाचे विस्तृतीकरण करण्यात आल्याचे दिसून आले शुंगांकडून काण्वांकडे सत्ता गेली. त्यानंतर सातवाहन घराण्याचा उदय झाला.

जैन आणि बौद्ध संप्रदाय हे श्रमण संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. त्यांचे स्वतंत्र संप्रदाय आहेत. त्या संप्रदायांचे स्वतंत्र साहित्यही आहे. जैन मतानुसार तो धर्म अतिप्राचीन असून या धर्मात होऊन गेलेल्या चोवीस तीर्थकरांपैकी वर्धमान महावीर हा शेवटचा तीर्थंकर होय. तो बुद्धाचा समकालीन होता. त्याचा जन्म इ.स. पूर्व ५४० मध्ये, आजच्या बिहारमधल्या वैशालीजवळच्या कुंदग्रामामध्ये झाला. त्याचा पिता जनत्रिका या क्षत्रिय टोळीचा नायक होता. त्याची आई त्रिशला ही लिच्छवी वंशातील होती. महावीराने तीस वर्षे सर्वत्र हिंडून जैन मताचा प्रसार केला. त्यामुळे त्याला जैन मताचे जनकत्व दिले जाते.

जैन धर्मातील मुख्य तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत: ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास नाही. या विश्वाचा कोणी निर्माता अगर नियंता नाही. मनुष्यच स्वतःची नियती घडवतो. चांगल्या अथवा वाईट कर्मानुसार फळे मिळतात. ही कर्मे मागच्या जन्मात केलेली असली तरी या जन्मात त्यांचे चांगले-वाईट परिणाम प्राप्त होतात. जैन संप्रदायाचा वेदांवर विश्वास नाही. तो ब्राह्मणांची अधिसत्ताही मानीत नाही. निर्वाण हेच मनुष्याचे एकमेव आणि अंतिम ध्येय असावे. प्रत्येकाला आत्मिक मुक्ती मिळविण्याचा अधिकार आहे.

अहिंसा, त्याग, कठोर तपस्या, कायाक्लेश या गोष्टींना जैन संप्रदायात महत्त्व आहे. यज्ञ आणि कर्मकांडावर मुळीच विश्वास नाही, तसेच जैन धर्मात जातिप्रथा पाळली जात नाही. जैन धर्माने मोक्षाला, मुक्तीला सर्वाधिक महत्त्व दिलेले आहे. गौतम बुद्ध हा बौद्ध धर्माचा संस्थापक होय. त्याचा जन्म इ.स. पूर्व ५६६ मध्ये कपिलवस्तूजवळच्या लुंबिनी वनात झाला. तो शाक्य होता आणि त्याचा पिता शाक्यांचा नायक होता.

गौतम बुद्धाने चार आर्यसत्ये सांगितलेली आहेत हे जग दुःखांनी आणि आपत्तींनी भरलेले आहे. दुःख आणि आपत्तींचे मुख्य कारण तृष्णा हे आहे. तृष्णेवर नियंत्रण ठेवले तर दुःख आणि आपत्तींपासून सुटका होऊ शकते. अष्टांगिक मार्गाचे आचरण केल्यास तृष्णेवर विजय मिळविता येतो. बुद्धाने सांगितलेला आर्य अष्टांगिक मार्ग पुढीलप्रमाणे: सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कॉंत, सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी. बुद्धाने पाच नैतिक मूल्ये सांगितली, ती 'पंचशील' म्हणून ओळखली जातात: अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. जैन मताप्रमाणेच बौद्ध धर्मातही यज्ञ आणि कर्मकांडावरील अविश्वास व्यक्त केलेला आहे, जातिप्रथेचा निषेध केलेला आहे.

इ.स. पूर्व सहाव्या शतकातील या दोन धर्माचा, त्यांच्या साहित्याचा नंतरच्या शतकांतील मानवी संस्कृतीवर खोल परिणाम झालेला दिसतो. त्याचप्रमाणे आणखी एका पंथाचा प्रभाव भारतीय संस्कृतीवर पडलेला आहे. तो पंथ म्हणजे कृष्णभक्तीचा पंथ. इ.स. पूर्व चवथ्या शतकापासून कृष्णभक्तिपंथ उदयास आला असावा असे म्हटले जाते. वैष्णव, शैव, शाक्त हे संप्रदाय इ.स.पूर्व सहाव्या शतकाच्या आधीपासूनचे असावेत. सहाव्या शतकानंतरच्या विविध राजवटींमध्ये स्थापत्य, शिल्प, चित्र आणि साहित्याच्या रूपाने या विविध धर्ममतांची चिन्हे उमटलेली आहेत.

दक्षिण भारतात व गुजराथमध्ये जैन धर्मास राजाश्रय मिळाला आणि त्यातील अनेक राजे जैन धर्माचे परम उपासक बनले. गंग, कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट इत्यादी राजवंशांनी जैन धर्मास उदार आश्रय दिला. अर्धमागधी व जैन प्राकृत या भाषांमध्ये जैनांचे तत्त्वज्ञान, पुराणे, काव्ये आणि गणित, वैद्यक, योगशास्त्र, राज्यशास्त्र, व्याकरण इत्यादी विषयांवर ग्रंथरचना झाली. मूर्ती, वास्तू व अन्य भारतीय कलांच्या विकासास जैनांनी विशेष हातभार लावला आहे (जोशी, लक्ष्मणशास्त्री, १९८२), बौद्ध धर्माचा अंगीकार सम्राट अशोकाने केला व त्याच्या साम्राज्याच्या काळात बौद्ध

धर्माच्या अनुयायांनीच गुहाशिल्प- स्थापत्याचा विकास केला आणि त्याला अभूतपूर्व असे कलात्मक रूप दिले. मौर्य, कुषाण, सातवाहन, वाकाटक इत्यादी राजवटींच्या काळात बौद्ध मूर्तिशिल्प आणि चित्रकला यांचा चरम विकास झाला. लोखंडाचा शोध, शेतीच्या अवजारांत सुधारणा, साम्राज्यवाद, धर्मपंथांचा उदय आणि साहित्य कलांचा विकास असा एक क्रम दिसून येतो,